# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ

क्र. संगाबाअवि/12/ **414** /2012
दिनांक : 19.01.2012

**प्रति,**

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय : आपल्या महाविद्यालयातील/पद्.शैक्षणिक विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांना साहसी शिबीरामध्ये सहभागी होण्याकरीता सुचित करण्याबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 11 व्या योजनेअंतर्गत अनुदान आयोगाच्या दिशानिर्देशानुसार **ट्रेकींग** या शिबीराचे आयोजन **दिनांक 30.01.2012 ते 08.01.2012** या 10 दिवसाचे कालावधीकरीता व **रॉक क्लांईम्बिंग** या शिबीराचे आयोजन दिनांक **30.01.2012 ते 03.02.2012** या 05 दिवसाचे कालावधीकरीता चिखलदरा येथे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाद्वारे संचालित राष्ट्रीय साहसी संस्था यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या साहसी शिबीरामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना/यांनी सहभागी होण्याच्यादृष्टीने **दिनांक 30.01.2012 रोजी दुपारी 12.00 वाजता हरिहर सभागृह, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे** नियमावलीत नमुद केलेल्या सर्वसंबंधित साहित्यांसह उपस्थित राहण्याकरिता सुचना देण्यात याव्या. ही विनंती.

उपरोक्त दोन्हीही शिबीरामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी तथा शिबीराच्या संबंधी इतर माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरील Departments/Board of Physical Edn. & Recreation येथे दर्शविण्यात आली आहे.

आपला

स्वा/-

(डॉ. अविनाश असनारे)
संचालक
शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ

## ट्रेकींग आणि रॉक क्लाईंम्बिंग या शिबीराची नियमावली

1) सदर शिबीरात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींनी नेमुन दिलेल्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

2) **ट्रेकींग -** या शिबीराचा कालावधी दिनांक 30.01.2012 ते 08.02.2012 यानुसार 10 दिवसाचा राहील तर **रॉक क्लाईंम्बिंग -** या शिबीराचा कालावधी दिनांक 30.01.2012 ते 03.02.2012 यानुसार 5 दिवसाचा राहील.

3) सदर शिबीराचे आयोजन हे विद्यार्थ्यांसाठी गिर्यारोहण व पदभ्रमण या बाबी शिकण्याकरीता पर्वणी राहणार असून विद्यार्थ्यांनी नविन ज्ञान आत्मसात करण्याच्यादृष्टीने स्वतः बरोबर कॅमेरा, व्हीडीओ कॅमेरा, विविध नोंदवह्या आदी बाळगल्यास हरकत राहणार नाही.

4) कोणत्याही विद्यार्थी / विद्यार्थीनीस शिबीराचा कालावधी पुर्ण झाल्याशिवाय मधून शिबीर सोडून जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस शिबीर सोडून जावे लागल्यास अशा विद्यार्थी / विद्यार्थ्यीनीस सहभागीता प्रमाणपत्र प्रदान करण्याचे अधिकार समितीकडे राहतील.

5) उपरोक्त नमुद केलेले दोन्हीही शिबीरे ही आव्हानात्मक स्वरूपाची असल्याने सहभागी विद्यार्थी / विद्यार्थीनींनी तज्ञ मार्गदर्शकांद्वारे देण्यात येणाऱ्या सुचनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

6) सदर शिबीर हे मेळघाट व चिखलदरा या परिसरात आयोजित करण्यात येणार असून या परिसरातील तापमान कमी राहत असल्याने संबंधित विद्यार्थी / विद्यार्थीनींनी आवश्यक ते गरम कपडे स्वतःसोबत घेणे अनिवार्य राहील. सहभागी होणाऱ्या सर्वसंबंधित शिबीराऱ्यांनी स्वतः सोबत किमान तीन जीन्स पॅन्ट, तीन शर्ट, एक चादर, एक टॉवेल, नॅपकीन कीट, स्पोर्टस् शुज, स्लिपर अथवा चप्पल, टॉर्च, मेणबत्ती, आगपेटी, नेलकटर, टुथपेस्ट, टुथब्रश इत्यादी साहित्य घेणे आवश्यक आहे.

7) सदर शिबीर हे मेळघाट व चिखलदरा या परिसरात आयोजित करण्यात येणार असल्याने व सदर ठिकाणी पोहचावयाचा रस्ता हा घाट व वळण मार्गाचा असल्यामुळे वमन प्रक्रीयेचा त्रास असणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी प्रवासादरम्यान वमन प्रतिरोधक औषधांचा साठा सोबत ठेवून आवश्यकतेनुसार त्याचा उपयोग करावा.

8) संपुर्ण शिबीर कालावधीमध्ये परिसरात तंबाखू व गुटखा सेवन, धुम्रपान, मध्यपान आदि बाबींचा उपयोग करून नये. तसे आढळल्यास संबंधित शिबीरार्थ्यास शिबीरातुन बाद करण्यात येऊन तात्काळ परिसरातुन निष्कासित करण्यात येईल व त्याला स्वगृही परत पाठविण्यात येईल. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा खर्च आयोजक संस्था अथवा विद्यापीठामार्फत दिला जाणार नाही.

9) शिबीरार्थ्यांकरीता दैनंदिन कार्यक्रमाव्यतिरिक्त सांस्कृतिक देवाण-घेवाणीच्यादृष्टीने रात्रौ कॅम्प फायरचे आयोजन केले जाईल. त्यादृष्टीने शिबीरार्थ्यांनी स्वतःस अवगत असलेल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची संधी आयोजकांमार्फत प्रदान केली जाईल.

10) मार्गदर्शकांकडून नेमून दिलेल्या वेळेचे पालन करणे शिबीरार्थ्यांस अनिवार्य राहील. वेळापत्रकाचे पालन न करणाऱ्या शिबीरार्थ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार आयोजकांचे राहतील.

11) शिबीरार्थ्यांनी स्वतःसोबत आणलेल्या सर्व मौल्यवान वस्तुंची निगा स्वतःचे स्तरावर राखावी. अशा वस्तु गहाळ झाल्यास आयोजकामार्फत अथवा विद्यापीठामार्फत कोणत्याही स्वरूपाची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

12) नियोजित कार्यक्रमांमध्ये कोणत्याही स्वरूपाचे बदल करण्याचे सर्व अधिकारी आयोजक अथवा विद्यापीठाचे राहतील.

13) आवश्यकतेनुसार कोणत्याही स्वरूपाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे संपुर्ण अधिकार आयोजक अथवा विद्यापीठाचे राहतील, असे बदल पुर्वसुचना दिल्याशिवाय देखिल केले जाऊ शकतील.

14) शिबीरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थीनींना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी. याबाबत कोणत्याही स्वरूपाची तक्रार एखाद्या विद्यार्थीनीने केल्यास अशा विद्यार्थ्यास शिबीरातुन बाद करण्यात येईल.

15) विद्यापीठाद्वारे ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींची या उपक्रमाकरिता निवड झाली आहे, केवळ त्याच विद्यार्थी/विद्यार्थीनींनी दिनांक 30.01.2012 रोजी दुपारी 12.00 वाजता हरिहर सभागृह, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे उपस्थित रहावे.

16) विद्यार्थ्यास स्वतःचे गावापासून ते अमरावती व परत हा प्रवास खर्च स्वतः करावा लागेल.

17) संपुर्ण शिबीरादरम्यान विद्यार्थ्यांना चहा नाश्ता, दुपारचे जेवण, दुपारचा चहा व रात्रीचे जेवण आयोजकांमार्फत पुरविण्यात येईल.

18) अधिक माहितीकरिता संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेशी **99229 30166** या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा.

स्वा /-

(डॉ.अविनाश असनारे)
संचालक,
शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# ट्रेकींग कॅम्प करीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे

## *Trekking Camp Date 30.01.2012 to 08.02.2012*

| अ.नं. | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नांव | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|
| 01. | श्री सचिन गजानन खंडारे | नॅशनल बी.एड. कॉलेज, खामगांव, जि. बुलडाणा |
| 02. | श्री उमेश रमेशराव गुजर | श्रीमती राधाबाई सारडा कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती |
| 03. | श्री उत्तम सिंह | इंदुताई मेमोरीअल शारीरिक शिक्षण महाविद्यालय, बुलडाणा |
| 04. | श्री वैभव प्रकाशराव जुनघरे | संत गाडगे महाराज महाविद्यालय, वलगांव, जि. अमरावती |
| 05. | श्री भुषण वासुदेवराव टेकाम | कला महाविद्यालय, जरूड, ता. वरूड, जि. अमरावती |
| 06. | श्री आकाश प्रदीप वानखडे | श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 07. | श्री कार्तिक सुनिल बोकिलवार | श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 08. | श्री महेश उत्तमराव कथे | भारतीय महाविद्यालय, मोर्शी |
| 09. | श्री राहुल भिमराव श्रीराव | महात्मा ज्योतीबा फुले कला व विज्ञान महाविद्यालय, भातकुली |
| 10. | श्री नितीन रूपराव जाधव | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती |
| 11. | श्री मंगेश रवि शिरसाट | कला महाविद्यालय, बुलडाणा |
| 12. | श्री विकास कालुराम कासदेकर | विद्याभारती महाविद्यालय, अमरावती |
| 13. | श्री सौरभ विजय कालावाटे | राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे जि. अमरावती |
| 14. | **कु. प्रणिता नंदकिशोर मेश्राम** | इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती |
| 15. | **कु. दिपाली रामरावजी गडवार** | श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती |
| 16. | श्री अरविंद गोविंदराव पवार | सत्यजित बी.एड. कॉलेज खंडाळा, मेहकर, जि. बुलडाणा |
| 17. | श्री कपील मदनराव सोळंके | मिलिंद महाविद्यालय, मुळावा |
| 18. | श्री श्रावण पंजावराव अंबोरे | बाबाजी दाते कला आणि महाविद्यालय, यवतमाळ |
| 19. | श्री मकरंद प्रकाश भाकरे | प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड मॅनेजमेंट, अमरावती |
| 20. | श्री रवि परशरामजी बडके | कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा |
| 21. | श्री संतोष बबनु काळे | स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, परतवाडा |
| 22. | श्री मोहम्मद ताहीर मो.सिद्दीक | डॉ.शामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय, शेंदूरजना घाट |
| 23. | श्री सुदर्शन कालीदास बेहेरे | गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद |
| 24. | श्री शिवा सिद्धार्थराव गायकवाड | श्री आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी |
| 25. | श्री रोषन प्रल्हादराव अधव | इस्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ऑफ स्टडिज महाविद्यालय, वरूड |
| 26. | श्री अंकुश अरूण मेश्राम | युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 27. | श्री राहूल अभिमयु डुकरे | राजर्षी शाहु अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलडाणा |
| 28. | श्री सागर रमेश तोटावार | बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता.घाटंजी |
| 29. | श्री विकास अंकुश इंगळे | विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, हिवरा आश्रम |
| 30. | श्री गौरव शरद कावरे | भाऊसाहेब जाणोरकर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला. |

## रॉक क्लाईंब्मिंग कॅम्प करीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे

## *Rock Climbing Camp Dates 30.01.2012 to 08.02.2012*

| अ.नं. | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नांव | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|
| 01. | श्री ललित श्रीरामजी गाढवे | संगणक शास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ |
| 02. | श्री अमुल श्रीकृष्ण खांडेकर | संगणक शास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ |
| 03. | श्री श्रीनिवास नारायणस्वामी नाईकर | संगणक शास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ |
| 04. | श्री आकाश सुरेशराव निळे | भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती |
| 05. | श्री संतोष विजय राठोड | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), ता. मानोरा, जि. वाशिम |
| 06. | श्री अजींक्य विठ्ठलराव चोपडे | सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला |
| 07. | श्री संदीप दयाराम सहाणे | डॉ.भाऊसाहेब नंदूरकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, यवतमाळ |
| 08. | **कु. प्रणाली अंबादासजी भगत** | श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि. अमरावती |
| 09. | श्री पवन हरिभाऊजी जिरापुरे | श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती |
| 10. | श्री देवेंद्र राजेश उके | श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ |
| 11. | श्री सचिन रामराव जामकर | मिलिंद महाविद्यालय, मुळावा |
| 12. | श्री नौशाद रमजान शहा | डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगांव (तेल्हारा), जि. अकोला. |
| 13. | श्री स्वप्नील मुकुंदराव बनसोड | श्री बी.एम.डी. भारती महाविद्यालय, आर्णी, जि. यवतामाळ |
| 14. | श्री सौरभ सुरेशराव भेंडे | प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड मॅनेजमेंट, अमरावती |
| 15. | श्री अमोल जगन्नाथ मुर्तडकर | पंकज लद्दड इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड मॅनेजमेंट स्टडिज, बुलडाणा |
| 16. | श्री निलेश गुलाबराव खराडे | दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर, जि.बुलडाणा |
| 17. | श्री कुणाल अशोक वानखडे | जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापुर, जि. बुलडाणा |
| 18. | श्री निलेश पुंडलिक सरप | श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिम, जि. वाशिम |
| 19. | श्री भुषण महादेवराव कुरवाडे | श्री आर.आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती |
| 20. | श्री अंकुश रमेशराव झोपाटे | स्वातंत्र्य सैनिक श्री कन्हैयालालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड |
| 21. | श्री अतुल साहेबराव गावनेर | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती |
| 22. | श्री योगेश श्रीधर म्हसाळ | विद्याभारती महाविद्यालय, अमरावती |
| 23. | श्री सुशांत देवराव जाधव | गुलाम नबी आझाद कला व वाणिज्य महाविद्यालय, बार्शिटाकळी, जि. अकोला |
| 24. | श्री विजय भगवान निकम | श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल कला, वाणिज्य महाविद्यालय, मलकापुर, जि. बुलडाणा |
| 25. | श्री हरिश पांडूरंग लहाने | भाऊसाहेब जाणोरकर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला. |
| 26. | श्री निलेश श्रीराम निकम | एम.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर, जि. बुलडाणा |
| 27. | श्री चेतन गणेशराव राजुरकर | श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा |
| 28. | श्री राहुल अशोक काशीकर | श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा |
| 29. | **कु. रूपाली रमेशराव जेडुधाले** | जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा |
| 30. | श्री आकाश अर्जुन अंभोरे | आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला |